**महाराष्ट्र जनशक्ती** | ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : तिसरे | अंक : १५९ वे | दिनांक : ०४/०६/२०२६ | वार : गुरूवार

# राज्यात १७ पैकी ६ जागी महायुतीचे पारडे जड

**मुंबई :** राज्यातील विधान परिषदेच्या १७ जागांसाठी राजकीय रणधुमाळी सुरू झाली असून 'महायुती' विरुद्ध 'महाविकास आघाडी' (मविआ) असा थेट सामना रंगला आहे. बंडखोरी मोडून काढण्यासाठी पक्षांतर्गत पातळीवर प्रयत्न सुरू असतानाच, अर्ज छाननी आणि नाट्यमय घडामोडींमुळे ६ महत्त्वाच्या मतदारसंघांमध्ये महायुतीचे पारडे प्रचंड जड झाले असून, त्यांचा विजय जवळपास निश्चित मानला जात आहे.

उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत उद्या संपत असली, तरी त्यापूर्वीच सोलापूर, यवतमाळ, अमरावती आणि नाशिकमधील चित्र स्पष्ट झाले आहे. तर कोकणामध्ये महायुतीतील बंडखोर उमेदवार जुईली दळवींनी माघार घेतली आहे.

**१. कोकण: जुईली दळवींची माघार**

कोकण स्थानिक स्वराज्य संस्था विधान परिषद निवडणुकीच्या रिंगणातून एक मोठी आणि राजकीय घडामोडींनी प्रदीर्घ चाललेली नाट्यमय घडामोड समोर आली आहे. महायुतीमधील अंतर्गत धुसफूस आणि बंडाचे निशाण अखेर थंडावले असून, शिवसेनेचे आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्या जुईली दळवी यांनी आपला अपक्ष उमेदवारी अर्ज मागे घेतला आहे. या माघारीमुळे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) उमेदवार अनिकेत तटकरे यांच्या विजयाचा मार्ग आता सुकर झाला आहे.

**महायुतीतील अंतर्गत वाद आणि तणाव**

•रायगड-रत्नागिरी या मतदारसंघाकडे संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले गेले होते, कारण महायुतीत जागावाटपात हा मतदारसंघ राष्ट्रवादीच्या वाट्याला गेला आणि पक्षाने सुनील तटकरे यांचे सुपुत्र अनिकेत तटकरे यांना रिंगणात उतरवले. मात्र, महायुतीमधील मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेच्या (शिंदे गट) स्थानिक नेत्यांनी या उमेदवारीला तीव्र विरोध केला होता.

•आमदार महेंद्र दळवी यांच्या कन्येने बंडखोरी करत अपक्ष अर्ज भरला होता.

•महायुतीचे नेते आणि मंत्री भरत गोगावले यांचाही तटकरेंच्या उमेदवारीला कडाडून विरोध होता.मुख्यमंत्री शिंदेंच्या मध्यस्थीने वाद मिटला

•हा अंतर्गत वाद विकोपाला जात असल्याचे पाहून सुनील तटकरे यांनी थेट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली आणि स्थानिक पातळीवरील नाराजी दूर करण्याची विनंती केली. मुख्यमंत्र्यांच्या मध्यस्थीनंतर हा विरोध मावळला. विशेष म्हणजे, आज मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा रायगड दौरा होता आणि त्यांचे हेलिकॉप्टर जमिनीवर उतरण्यापूर्वीच जुईली दळवी यांच्या वतीने त्यांचा उमेदवारी अर्ज मागे घेण्यात आला.

**तब्येतीचे कारण आणि अर्ज माघारी**

•उमेदवारी अर्ज मागे घेताना भरत गोगावले यांचे सुपुत्र विकास गोगावले हे स्वतः उपस्थित होते. जुईली दळवी यांची प्रकृती ठीक नसल्याने त्यांच्या वतीने सूचक विघ्नेश माळी यांनी हा अर्ज मागे घेतल्याची माहिती विकास गोगावले यांनी प्रसारमाध्यमांना दिली.

**पालकमंत्री पदाबाबत गोगावलेंचे वक्तव्य**

•दरम्यान, रायगडच्या पालकमंत्री पदाच्या वादाबाबत पत्रकारांनी विचारले असता, "या संदर्भात मुख्यमंत्री आणि पक्षाचे वरिष्ठ नेते जे ठरवतील, तोच निर्णय अंतिम असेल," असे सांगत विकास गोगावले यांनी अधिक भाष्य करणे टाळले.

•अखेरच्या क्षणी झालेल्या या राजकीय तडजोडीमुळे महायुतीमधील संभाव्य बंडखोरी टळली असून अनिकेत तटकरे यांच्यासाठी ही निवडणूक आता सोपी झाली आहे.

**२. सोलापूर: 'मविआ'चा मुख्य उमेदवारच बाद**

सोलापूरमध्ये महायुतीने राजेंद्र राऊत यांना मैदानात उतरवले आहे, तर महाविकास आघाडीकडून काँग्रेसचे आदित्य फत्तेपूरकर रिंगणात होते. मात्र, अर्ज छाननीच्या प्रक्रियेत फत्तेपूरकर यांचा उमेदवारी अर्ज तांत्रिक कारणांमुळे बाद ठरला आहे. यामुळे 'मविआ'ला मोठा धक्का बसला असून आता त्यांना इतर कोणालातरी पाठिंबा द्यावा लागणार आहे.

**संख्याबळ:** सोलापूरमधील 614 मतदारांपैकी महायुतीकडे तब्बल 428 मते आहेत, तर मविआकडे केवळ 81 मते आहेत. त्यामुळे राजेंद्र राऊत यांचा विजय अतिशय सोपा झाला आहे.

**३. यवतमाळ: संख्याबळाअभावी 'मविआ'च्या उमेदवाराची माघार**

यवतमाळमध्ये महाविकास आघाडीला मोठा धक्का बसला, कारण त्यांचे अधिकृत उमेदवार साहेबराव कांबळे यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालयात जाऊन आपला अर्ज मागे घेतला. पुरसे संख्याबळ पाठीशी नसल्याने आपण हा निर्णय घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**संख्याबळ:** या मतदारसंघातील एकूण 446 मतदारांपैकी मविआकडे फक्त 131 मते होती. हा फरक लक्षात घेता कांबळे यांनी लढतीतून माघार घेणे पसंत केले.

**४. अमरावती: भाजप बंडखोराचा अर्ज बाद**

अमरावतीमध्ये महायुतीचे अधिकृत उमेदवार प्रवीण पोटे पाटील यांच्याविरुद्ध भाजपचेच कार्यकर्ते विप्लव बजोरिया यांनी बंडखोरी करत अर्ज भरला होता. मात्र, मविआचे उमेदवार हर्षजीत देशमुख यांनी घेतलेल्या आक्षेपानंतर जिल्हाधिकाऱ्यांनी बजोरिया यांचा अर्ज बाद केला. या निर्णयाविरोधात बजोरिया यांनी न्यायालयात धाव घेतली आहे.

**संख्याबळ:** येथे एकूण 449 मतदारांपैकी महायुतीकडे 222, तर मविआकडे 148 मते आहेत. बंडखोरी टळल्यामुळे पोटे पाटील यांचा मार्ग सुकर झाला आहे.

**५. नाशिक: मविआचा अधिकृत उमेदवारच नाही**


नाशिकची जागा महाविकास आघाडीत ठाकरेंच्या शिवसेनेला सुटली होती, परंतु पक्षाने येथे कोणताही उमेदवार उभा केला नाही. त्यामुळे आता रिंगणातील अपक्षांपैकी मविआ कोणाला पाठिंबा देते, यावरच विरोधकांची गणिते अवलंबून राहतील.

**संख्याबळ:** येथे एकूण 603 मतांपैकी महायुतीकडे 454 आमदारांचे भक्कम संख्याबळ आहे. परिणामी, महायुतीचे उमेदवार नरेंद्र दराडे यांच्या विजयाची केवळ औपचारिकता बाकी असल्याचे बोलले जात आहे.

**६. छत्रपती संभाजीनगर: सत्तारांचे बंड थंड**

छत्रपती संभाजीनगर-जालना विधान परिषद निवडणुकीतून समीर सत्तार माघार घेणार आहेत, अशी माहिती बुधवारी अब्दुल सत्तार यांनी दिली. महायुतीमध्ये ही जागा भाजपच्या वाट्याला आली आहे. त्यामुळे येथून भाजपचे सुहास शिरसाट यांनी अर्ज दाखल केला आहे. मात्र, या ठिकाणी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नेते अब्दुल सत्तार यांचे चिरंजीव समीर सत्तार यांनी अर्ज दाखल करत बंडखोरी केली होती. मात्र, ही बंडखोरी शमवण्यात भाजपला यश आले आहे. या संदर्भात बोलताना अब्दुल सत्तार म्हणाले की, 'माझे आणि मुख्यमंत्र्यांचे फोनवर बोलणे झाले आहे. त्यांनी सांगितले की उमेदवारी अर्ज मागे घ्या. उद्या मी कार्यकर्त्यांनी बोलावून घेत समीर सत्तार यांना अर्ज मागे घ्यायला लावणार आहे.'

## निदा खानला आश्रय दिल्याच्या प्रकरणात इम्तियाज जलील यांची चौकशी करा; संजय शिरसाट



**छत्रपती संभाजीनगर :** नाशिकमधील नामांकित आयटी कंपनी टीसीएसमध्ये (TCS) समोर आलेल्या धर्मांतरण प्रकरणाने आता राज्याच्या राजकारणात मोठी खळबळ उडवून दिली आहे. या प्रकरणातील मुख्य संशयित निदा खान हिला छत्रपती संभाजीनगरमध्ये सुरक्षित आश्रय देण्यात आला होता, असा आरोप केला जात आहे. या संपूर्ण कटामागे एमआयएमचे माजी खासदार इम्तियाज जलील यांचा हात असल्याचा थेट आरोप राज्याचे मंत्री संजय शिरसाट यांनी केला आहे. निदा खान प्रकरणात इम्तियाज जलील यांची चौकशी करा, अनेक धागेदोरे समोर येतील, असा दावा संजय शिरसाट यांनी केला आहे.

माध्यमांशी बोलताना संजय शिरसाट यांनी या प्रकरणाचे गांभीर्य अधोरेखित केले. "हे निदा खान प्रकरण अत्यंत गंभीर असून ते अजिबात लहान नाही. यामागे लव्ह जिहाद, जबरदस्तीने लग्न लावून देणे आणि अशा देशविघातक गोष्टींना मोठ्या प्रमाणावर पैशांचा पुरवठा करणे असे अनेक मोठे धागेदोरे आहेत. निदा खान ही महिला एकटी इतके मोठे कृत्य करूच शकत नाही. नाशिकमधील गुन्हा उघडकीस आल्यानंतर ती आधी मुंब्रा येथे पळून गेली आणि तिथून ती छत्रपती संभाजीनगरमध्ये आली, जिथे तिला जाणीवपूर्वक लपवण्यात आले."

संजय शिरसाट यांनी सांगितले की, "या प्रकरणात नाव आलेले एमआयएमचे नगरसेवक मतीन पटेल यांनी चौकशीदरम्यान थेट इम्तियाज जलील यांचे नाव घेतले आहे. "गुन्हेगाराला आश्रय देणे हा देखील गुन्हाच आहे. त्यामुळे पोलिसांनी आता एफआयआरच्या आधारे इम्तियाज जलील यांची तातडीने चौकशी करावी," अशी मागणी त्यांनी लावून धरली आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली असून, फडणवीस यांनी कोणत्याही दोषीला सोडले जाणार नाही," असे आश्वासन दिल्याचे संजय शिरसाट यांनी सांगितले.

दरम्यान, या संवेदनशील प्रकरणाचा तपास करण्यासाठी स्थापन करण्यात आलेले विशेष तपास पथक (SIT) सध्या युद्धपातळीवर काम करत आहे. पोलिसांनी मतीन पटेल याचा मोबाईल फोन जप्त केला असून, तांत्रिक विभागामार्फत त्यातील जुना डेटा रिकव्हर करण्याचे काम सुरू आहे. मतीन पटेलच्या फोनवरून संशयास्पद काळात इम्तियाज जलील आणि इतर बड्या पदाधिकाऱ्यांशी संभाषण झाल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. निदा खान फरार असताना तिला संभाजीनगरमध्ये सुरक्षित ठेवण्यासाठी मतीन पटेलला नेमके कोणाचे आदेश होते, याचा शोध एसआयटी घेत आहे. नाशिक पोलिसांनी यापूर्वीच मतीन पटेलची दोनदा चौकशी केली असून, त्याला पुन्हा एकदा हजर राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

निदा खानला छत्रपती संभाजीनगरमध्ये आश्रय दिल्यानंतर संशयाची सुई एमआयएमभोवती असल्याने आणि थेट माजी खासदारांचे नाव समोर आल्याने पोलिसांनी तपासाचा फास आवळला आहे. मतीन पटेलच्या चौकशीतून आणि मोबाईल डेटाच्या विश्लेषणातून कोणते नवीन खुलासे होतात आणि इम्तियाज जलील यांच्यावर काही कारवाई होते का? हे आता पाहावे लागणार आहे.

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क | एम.फिल-पी.एच.डी. थेसिस | मराठी, हिंदी, इंग्रजी | कलर प्रिंट स्कॅनिंग | झेरॉक्स | स्पायरल बायंडिग | लॅमिनेशन | थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ जून २०२६


## वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन (HSRP) नंबरप्लेट ३० जुन पुर्वी बसविणे बंधनकारक

**बीड, (भगवंत पाळवदे) :-** केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम ५० नुसार राज्यातील सर्व शासकीय आणि खाजगी वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट बसवणे अनिवार्य करण्यात आले आहे. या संदर्भात प्रशासनाकडून अत्यंत महत्त्वाची माहिती समोर आली असून, १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना दि. ३० जून २०२६ पर्यंत ही नंबर प्लेट बसवणे बंधनकारक आहे. अशी माहिती उपप्रादेशिक परिवहन अधिकारी बालाजी धनवे यांनी दिली आहे.केंद्रीय रस्ते व महामार्ग मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या ६ डिसेंबर २०१८ रोजीच्या राजपत्रानुसार, १ एप्रिल २०१९ पासून उत्पादित होणाऱ्या सर्व नवीन वाहनांना हाय सिक्युरिटी नंबर प्लेट इन-बिल्ट म्हणजेच कंपनीकडूनच बसवून देणे अनिवार्य करण्यात आले होते. मात्र, आता १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व खाजगी तसेच शासकीय वाहनांनाही ही नंबर प्लेट बसवण्यासाठी दि. ३० जून २०२६ ही अंतिम मुदत देण्यात आली आहे.या नियमाच्या पार्श्वभूमीवर, सर्व शासकीय कार्यालय प्रमुखांना विशेष पत्रान्वये सूचित करण्यात आले आहे. आपल्या कार्यालयाच्या अभिलेखावर नोंद असलेल्या आणि १ एप्रिल २०१९ पूर्वी खरेदी केलेल्या सर्व शासकीय वाहनांना विहित मुदतीत म्हणजेच दि. ३० जून २०२६ पूर्वी उच्च श्रेणी नोंदणी पाटी बसवून घ्यावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

मुदतीपूर्वी हे काम पूर्ण झाल्यास या संदर्भातील अहवाल वरिष्ठ कार्यालयाला सादर करणे सोयीचे होईल, असेही उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, बीड यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## दौलताबाद परिसरात अवैध दारू विक्री बंद करा अन्यथा आंदोलन करू

**दौलताबाद (जावेद अहमद) :** परिसरात अनेक ठिकाणी 24 तास विनापरवाना अवैधरित्या देशी विदेशी दारू विक्री केली जात असून ही अवैध दारू विक्री लवकरात लवकर बंद करण्यात आली नाही तर नागरिक जन आंदोलन करतील असे निवेदन भाजपा अल्पसंख्यांक जिल्हा मंत्री शेख बने यांनी दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये देऊन मागणी केली. दौलताबाद परिसरात मोठ्या प्रमाणात 24 तास अवैध रीत्या देशी व विदेशी दारू विक्री केली जात असून यामुळे मोठ्या प्रमाणात तरुण नशेच्या आहारी जात आहे रोज घराघरात भांडणे होत असून रस्त्यावर, चौकात, हॉटेलमध्ये ही भांडणे वाढली आहे तसेच ऐतिहासिक दौलताबाद गावाची प्रतिमा मलिन होत असून या बाबीमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत आहे हे अवैध दारू विक्री लवकरात लवकर बंद करण्यात यावे असे निवेदन शेख बने यांनी दौलताबाद पोलीस स्टेशन मध्ये दिले व जर लवकरात लवकर हे अवैध दारू विक्री बंद केली नाही तर नागरिक तीव्र आंदोलन करतील असे निवेदनात नमूद केले आहे.

## मुलाला उमेदवारी न मिळाल्याने गुलाबराव पाटील नाराज



**जळगाव :** विधान परिषदेची जागा भाजपच्या वाट्याला गेल्याने आपल्या मुलाला आमदार करण्याचे शिवसेना शिंदे गटाचे नेते आणि राज्याचे मंत्री गुलाबराव पाटील यांचे स्वप्न अधुरे राहिले असून, यावरून ते प्रचंड नाराज आहेत. या जागेसाठी त्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी वारंवार चर्चा करूनही भाजपने ही जागा न सोडल्याने पाटील यांच्या मनातील खदखद कायम आहे. आज पुन्हा एकदा त्यांनी आपल्या खास शैलीत, 'नसीब में होगा तो उचलकर आयेगा, नही होगा तो...' अशी शेरोशायरी करत आपल्या मनातील या तीव्र भावनांना वाट मोकळी करून दिली आहे.

गुलाबराव पाटील म्हणाले, अनेक लोक म्हणतात की तुम्हाला विधानपरिषदेसाठी तिकीट मिळाले नाही. मात्र मी एवढेच सांगतो, 'नसीब मे होगा तो उचलकर आयेगा और नसीब में नही होगा तो आकर चला जायेगा', अशी शायरी त्यांनी म्हणून दाखवली. तसेच पुढे म्हणाले की, देवाच्या मनात यापेक्षाही पुढे आयुष्यात काही चांगले होणार असेल. त्यामुळे प्रारब्धावर विश्वास ठेवा. सगळं करा, राजकारण जरूर करा, पण भगवा प्रकाशातील विचार कधी सोडू नका. तुम्ही आमदार केले, मंत्री केले म्हणून मी सामाजिक कार्य करतो आहे. तुमची सेवा करू शकतो आहे, असेही पाटील यांनी म्हटले आहे.

आपल्या मुलाला विधान परिषदेची उमेदवारी मिळावी यासाठी मंत्री गुलाबराव पाटील यांनी अर्ज भरण्याच्या शेवटच्या क्षणापर्यंत मुंबईत ठाण मांडून एकनाथ शिंदे यांच्या अनेकदा भेटी घेत शर्थीचे प्रयत्न केले. मात्र भाजपने ही जागा सोडण्यास स्पष्ट नकार दिल्याने त्यांच्या पदरी मोठी निराशा आली आहे. शिंदे गटातील या उघड नाराजीचा फटका आगामी निवडणुकीत महायुतीच्या भाजप उमेदवाराला बसण्याची दाट शक्यता वर्तवली जात असून, या अंतर्गत खदखदीचा थेट फायदा विरोधकांच्या पथ्यावर पडणार असल्याची जोरदार चर्चा सध्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

आपले चिरंजीव प्रतापराव पाटील यांना उमेदवारी मिळावी यासाठी आग्रही असलेल्या मंत्री गुलाबराव पाटील यांनी, मुलाला तिकीट न मिळाल्याच्या नाराजीतून जळगावमधील भाजप उमेदवाराचा अर्ज दाखल करण्याच्या प्रक्रियेकडे थेट पाठ फिरवली. विशेष म्हणजे, यावेळी जळगाव जिल्ह्यात उपस्थित असूनही शिवसेनेचे इतर आमदार, पदाधिकारी आणि कार्यकर्ते यांनीदेखील अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला गैरहजर राहणे पसंत केल्याने, मित्रपक्ष भाजपवर असलेली शिंदे गटाची ही तीव्र नाराजी आता उघडपणे चव्हाट्यावर आली आहे.


### जाहिरात दर

१. पूर्ण पान (मल्टीकलर) ५०००/-

२. अर्धे पान (मल्टीकलर) ३०००/-

३. पाव पान (मल्टीकलर) २०००/-

४. शुभेच्छा जाहिरात ६००/-



### १२ वी सायन्स व B.Sc. पास विद्यार्थ्यांसाठी

शासन मान्यताप्राप्त जॉबगॅरंटी कोर्सेस

DMLT
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स

PGDMLT
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. (Microbiology, Chemistry, Botany, Zoology, Biochemistry, MLT, CLS)

X-RAY
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

C.T.SCAN
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

E.C.G.
कालावधी १ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

O.T. TECHNICIAN
कालावधी २ वर्ष
पात्रता : १०वी ,१२ वी पास

PG RADIOLOGY
कालावधी दिड वर्ष (३सेमिस्टर)
पात्रता : B.Sc. Physics

रेडिओलॉजी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

फिजिओथेरपी
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

ऑप्थोमेट्री
कालावधी २ वर्ष
पात्रता : १२ वी सायन्स पास

9405109103 | 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ जून २०२६


## समजून घ्यावे तुम्ही

काळया काळया ढेकळात,
बळीराजा जिरवितो घाम.
नित्य जगाच्या सुखासाठी,
उन्हातान्हात करतो काम. १

समजून घ्यावे तुम्ही माझ्या,
बळीराजाच्या कष्टाची कहाणी.
दिवसरात्र राबणाऱ्या बापाची,
आहे जगतांना साधी रहाणी. २

बळीराजा माझा ठेवत नाही,
राबतांना कुठलाच स्वार्थ.
फळाविना राबतांना वाटे,
महाभारतातला तो पार्थ. ३

बळीराजाला सारे देती दुःख,
खळ्यावर भरदिवसा लुटून.
सर्वांसाठी जगतांना त्याचे,
जगणे जाते कायम सुटून. ४

आता समजून घ्यावे तुम्ही,
निस्वार्थपणे जगण्याची कथा.
तेव्हाच दिसेल तुम्हा सर्वांना,
निस्वार्थी जीवनातील व्यथा. ५



**नागेश बोंतेवाड,**
**छत्रपती संभाजीनगर**


प्रवेश सुरू
डी.एम.एल.टी.
P.G.DMLT
फिजोओथेरिपी
डिप्लोमा ऑप्थोमेट्री
OT टेक्नीशियन
X-Ray, ECG
रेडीओलॉजी
संपर्क
9405109103


## "थोडे दिवस थांबत चला"

थोडे दिवस थांबत चला,
वेळेला थोडं फिरू द्या,
खोट्या वैभवाचू वादळांना
सत्याशी एकदा भिडू द्या।
ज्यांनी हरामाच्या पैशावर
उंच उड्या मारल्या होत्या,
गरीबांच्या घामाच्या थेंबांवर
महाल उभारल्या होत्या।
त्यांच्या दारी दिसते
सोन्याची झगमग भारी,
पण आतल्या काळोखाने
झोप उडवली सारी।

थोडे दिवस थांबत चला,
नशिबाचे चक्र फिरते,
आज ज्यांच्या मुठीत सत्ता
उद्या त्यांच्याच हातून निसटते।
खोटेपणाच्या बाजारात
ते सत्याला विकत होते,
इमानदारांच्या जखमांवर
हसत मीठ चोळत होते।
गरीबांच्या हक्कांवरती
ज्यांनी डल्ले मारले,
त्यांच्या सुखाच्या रात्रींनी
आज अश्रूंचे दिवे लावले।

थोडे दिवस थांबत चला,
काळ सगळ्यांचा हिशोब ठेवतो,
कुणाच्या डोळ्यांतील पाणी
व्याजासकट परत देतो।
ज्यांनी पैशाच्या मस्तीमध्ये
नाती सारी तोडून टाकली,
आईच्या थरथरत्या हातांनाही
दारातून हाकलून लावली।
आज त्यांच्या मोठ्या घरात
एकटेपणाची राख उरली,
हसणाऱ्या चेहऱ्यांमागे
मनाची भिंत कोसळली।

थोडे दिवस थांबत चला,
फसवे चेहरे ओघळतील,
मुखवट्यांच्या गर्दीमधले
खरे चेहरे उघडतील।

थोडे दिवस थांबत चला
ज्यांनी पदाच्या गर्वामध्ये
लोकांना तुडवलं खाली,
त्यांच्या पावलांनाही
भीतीची पडते बेडी ।

थोडे दिवस थांबत चला,
कर्म उशिरा का होईना ऐकते,
निरपराधांच्या हुंदक्यांना
न्यायाचं उत्तर देते।
ज्यांनी हरामाच्या पैशावर
उड्या मारल्या जगामध्ये,
त्यांची झोप उडते
स्वतःच्या पापांच्या सावलीमध्ये।

म्हणून म्हणतो थांबत चला,
काळ कुणालाच सोडत नाही,
खोट्या सोन्याच्या चमकांनी
सत्य कधीच झाकलं जात नाही।

**डॉ. बाळासाहेब लिहिणार**

# पतीनेच केली पत्नीची कुऱ्हाडीने वार करून निर्घृण हत्या



**पैठण** : शहरात अल्पवयीन मुलाच्या खुनाची घटना ताजी असतानाच बुधवारी (दि. ३) सकाळी एका पतीने पत्नीचा कुऱ्हाडीने वार करून निर्घृण खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली. संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील झाडझुडपांनी वेढलेल्या पाणवठ्याजवळ ही घटना घडली. खून केल्यानंतर आरोपी पती स्वतः पोलिस ठाण्यात हजर झाल्याने शहरात एकच खळबळ उडाली आहे.

मृत महिलेचे नाव मंदाबाई सुरेश अंगारखे (वय ४५, रा. गांगलवाडी, नारळा, पैठण) असे आहे. तर आरोपी पती सुरेश अंगारखे याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सुरेश व मंदाबाई अंगारखे हे बुधवारी सकाळी नेहमीप्रमाणे संत ज्ञानेश्वर उद्यान परिसरातील झाडझुडपे असलेल्या भागात सरपणासाठी लाकडे तोडण्यास गेले होते. यावेळी आरोपी सुरेश अंगारखे याने सोबत आणलेल्या कुऱ्हाडीने पत्नीच्या डोक्यावर व शरीरावर सलग तीन वार केले. गंभीर जखमी झालेल्या मंदाबाई रक्ताच्या थारोळ्यात कोसळल्या आणि त्यांचा जागीच मृत्यू झाला.


घटना घडल्यानंतर आरोपी सुरेश अंगारखे थेट पैठण पोलिस ठाण्यात पोहोचला. तेथे त्याने पोलिसांना, "मी माझ्या बायकोला कायमचे संपविले, असे सांगत गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. पोलिस निरीक्षक महादेव गोमारे, पोलिस उपनिरीक्षक वैभव सारंग, ऋषिकेश तळेकर, पोलिस कॉन्स्टेबल शुभम पाटील, कल्याण ढाकणे व इतर कर्मचाऱ्यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला. तसेच खुनासाठी वापरण्यात आलेली कुऱ्हाड जप्त करण्यात आली.

मृतदेह शवविच्छेदनासाठी पैठण येथील शासकीय रुग्णालयात हलविण्यात आला आहे. आरोपीने पत्नीचा खून नेमक्या कोणत्या कारणातून केला, याबाबत अद्याप स्पष्ट माहिती समोर आलेली नसून पैठण पोलिस या प्रकरणाचा सखोल तपास करीत आहेत.या घटनेमुळे पैठण शहरात भीतीचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले असून सलग घडणाऱ्या गंभीर गुन्ह्यांमुळे नागरिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे.


ADMISSION OPEN
10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses
DMLT
P.G.DMLT
X-RAY
C.T.-SCAN
E.C.G.
Radiology
Physiotherapy
Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology
Contact: 9405109103
8830838903

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ जून २०२६

# मनुवादी समाजव्यवस्थेत जळणार्या भटक्यांचा ज्वलंत ज्वालामुखी 'वेशीबाहेर': विद्रोही कवी साहेबराव मोरे




**वे**शीबाहेर दूरवर अडवळणी जागेवर, दरीखोरीत आडोश्याला उभी राहिलेली पालमांडी संस्कृती म्हणजे भारतीय संस्कृतीला लागलेला काळाकुट्ट डाग , पालमांडी जनसमुदायाला हक्काचे घर, वावर, उदरनिर्वाहाचं साधन, स्रोत काहीच नसतं. खुलं आकाश, विस्तृत जंगल, जलाशय, बंजर जमीन तीही तात्पुरती. कुणीही त्यांना कुत्र्या मांजरागत हाकलून लावतात, हे उपरेपण अतिशय सटीकपणे "वेशीबाहेर " काव्यसंग्रहात आले आहे.राजेश भांडे यांचा हा पहिलाच काव्यसंग्रह आहे.भांडे परिवर्तनवादी चळवळीचे झपाटलेले कार्यकर्ते असल्याने भटक्या विमुक्तांच्या उन्नतीसाठी झटणाऱ्या कार्यकर्त्यांच्या बलिदानास हा काव्यसंग्रह समर्पित केला आहे.उन्हं ,वारा ,पाउस, वादळी तडाखा झेलणार्या , मानवी अत्याचारी कचाट्यात पिचलेल्या काबाडकष्ट करून अर्धनग्न, अर्धपोटी जीवन जगणारा मोठा वेशीबाहेरचा लोक समूह अधोरेखित करणारा हा काव्यसंग्रह.लातूरच्या पंचक्रोशीतील वास्तववादी साहित्यिक म्हणून कवी भांडे यांचे नाव या निमित्ताने समाजापुढे आले.,साहित्यजगतात चर्चेत राहिले.समाजातील खरीखुरी वेदनेची अतिशय जाज्वल्यमांडणी लक्षवेधक ठरते. साक्षात कडकलक्ष्मी डोक्यावर नाचवण्यापेक्षा डोक्यात घ्या असा सडेतोड "आसूड" ओढणारी ही कविता , " आई लक्ष्मी डोक्यावरतीलक्ष्मी माझी अर्ध पोटी दारी नाही अक्षर पाटी " शिक्षण नाही म्हणून युगानुयुगे अंधभक्त पोतराज लोकांपुढे पोटाची खळगी भरण्यासाठी याचना करीत नागड्या शरीरावर चाबुक ओढतो, हे भीषण वास्तव वाचकाला वैचारिक मंथन करायला भाग पाडते. अशा अनेक आदिवासी जमातीतील उपजाती जगण्यासाठी धडपड करीत आहेत. ही मूलनिवासींची धडपड भांडे च्या कवितेत मूळ स्थानी दिसते. "मातेर", शिल्पकर्मी, "डोंबारी", दैवरूपी, कैकाडी, "मुखवटे," दैव" ह्या कवितांचा नामोल्लेख टाळून चालणार नाही. शीर्षक लक्षणार्थी आहेतच पण व्यवसायाधिष्टीतही आहेच.आकांक्षा, ध्येय हरवलेला बाप, दुध आटलेली अर्धनग्न मायची चित्तरकथा "वेशीबाहेर "शीर्षक कवितेतून व्यक्त केली आहे, "गावोगाव रस्ता रस्ता भटकतध्येय आणि आकांक्षा हरवलेला माझा बाप जीवनाची लक्तरे वेशीवर टांगून अर्धपोटी अर्धनग्न माझी आई तिच्या वांग्याच्या भरीत झालेल्या स्तनातदुधाचा एक थेंब नाही "(१९) वांग्याच्या भरीताची आईच्या स्तनांशी केलेली कविकल्पना विदारकता अधोरेखित करते आई माहात्म्य आणि गरीबीवर मातृत्वाची मात. " ऊसतोड "कवितेत व्यक्त होताना कामागाराचे दारिद्र्यात खितपत पडलेल्या जीवन संघर्षाची व्यथा मांडते, "माझ्या हातातील कोयतेसपासप उभा ऊस कापतेसंगे माझं तान्हुल बाळतोंडी ऊसाची चोईटी चोखते" (३६)एक सामाजिक कार्यकर्ता राजकीय, सामाजिक,आर्थिक विषमतेच्या छिन्न विच्छिन्न व्यवस्थेची चिरफाड करतो, डॉ आंबेडकर यांच्या मानवतावादी मूल्यशिक्षणाच्या बळावर सडक्या धर्म दंभावर तुडुन पडतो हे " जागर मधून उजागर होते,असा घाला रे जागरहसावा भीमराव आंबेडकर घराघरांमध्ये तूम्ही पेटवून द्या रेमाझ्या सावीत्रीची मशाल"(८०)सावीत्रीला आद्यशिक्षिका मानायला आजही धर्मवेडे तयार नाहीत . न्याय मिळवून देण्यासाठी भांडे कवितेलाच आव्हान करतात,"..हे कविते....!माझ्या कवितेतून स्वातंत्र्य,समता वंचितांना न्याय मिळू देहे शब्द गंधे माझ्या शब्दाशब्दातून देशासाठी लढणारे हात दे"(८०) शब्दांशब्दातून क्रांती पेलणारा हा लढवैय्या कवी आहे.अंधश्रद्धेचा जोखड ,रुढी परंपरेच्या नादात सालोसाल चाचपडणार्या बंजारा समाजाचे वास्तव "तांडा" कवितेत व्यक्त केले आहे, आज तांडा वस्तीत सुधारणा होतेय, तथापि न्याय व्यवस्थेवर नेमके बोट ठेऊन कवी राजेश भांडे लिहितात," नव्या युगाचे नवे वारे सुटले आहे तर मायबाप हो! येथेही थोडे वाहू द्या उशिरा का होईना शेवटच्या व्यक्तीला इथेही थोडे न्यायदान होऊ द्या "(३५). स्वातंत्र्य ७५ वर्षाचे झाले आमचे कुशासन ७५री जल्लोषात साजरी करण्यात मश्गूल आहे स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय असते? हा टोकदार प्रश्न विचारणारी व्यवस्था डोंगर दरीत, वाडापड्यात आजही आदिम काळातील जीवन जगत आहे या अनुषंगाने विविध सामाजिक जीवनमभान ठेवून आलेला हा कसदार काव्यसंग्रह आहे. एकीकडे शिक्षण नाही, आहे ते बंद पाडण्याचे नवनवीन कारण सरकार देते.दुसरीकडे शिक्षितही परिस्थितीच्या जंजाळात रूतलेले. स्पर्धा परीक्षांची मुद्दामहून होणारी पेपरफुटी, अनियमितता यातून उफाळून आलेल्या बेरोजगारीचा अजगर शिक्षित तरुणांना नपुंसक बनवत आहे तरणाई भरकटत परिस्थितीशी फारकत घेते." तरूणांनो" कवितेत कवी हे जळजळीत सत्य मांडतो,"शेतात पिक वाळत आहे काळ्या मातीत माय राबती आहे तुमच्या नपुंसकलिंगी शिक्षणासाठी बाप शेतातल्या बांधायचा कोपरा न् कोपरा विकत आहे" (३१)हे शेतकरी वास्तव मन पिळवटून टाकणारे आहे जनतेची अंधभक्तता,आत्महत्या करणाऱ्या बळीराजाची हतबलता,. लोकांमध्ये भ्रष्टाचारी, लाचखोर नेत्यांविरोधात, अत्याचारी प्रशासकीय यंत्रणेची खदखद व्यक्त होत नाही.मनमानी राज्यव्यवस्थेविषयी चकार शब्द काढत नाही हा संताप "सगळे कसे मुर्दाड झालेत साले" कवितेत दिसतो.फुले शाहू आंबेडकर विचारधारा जपणारी जातकुळी असलेल्या कवीची धारणा सामान्य जनतेपर्यंत मानवतावादी मूल्ये साहित्यातून पोहचविण्याची आहे.हे रूजविणास्तव हवे असलेले शिक्षण वेशीबाहेर पोहचलेच नाही, तरीही परिवर्तनवादी आशावाद " मातेरं "कवितेत व्यक्त केला आहे." रस्ता आणि मानव" ," नामांतर"," नवा लढा," " समाजसेवक" ,आमचं काय चुकलं?,"छेद" , "पाठींबा" आदी कविता चळवळीतील निष्ठावंत कार्यकर्त्यांची तळमळ प्रदर्शित करतातसामाजिक दांभिकपणा, राजकीय सत्तालोलूपं धार्मिक धृवीकरण आणि भांडवलधार्जिण्या सरकार विरोधातला रोष "क्रांती", कवितेत बेडरततेने भांडे मांडतात,"बरे झाले या देशात इंग्रज आलेज्योती,सावीत्रि, डॉ आंबेडकर शिकलेविधवा विवाह सतीची चाल बंद झाली लोकशाहीसाठी संविधानाची निर्मिती झाली" (८५)गरीबी, शोषण, बेरोजगारी, जातीय तेढ, अंधश्रद्धा, अंधभक्तता, शिक्षण, वंचितांचे उपेक्षितांचे जग,यासह पर्यावरण, नातीगोती, निसर्ग व मानव, महापुरुषांचे पुतळे,शिकवण अशा बहु विषयांवरील कविता संग्रहात आहेत.कवी राजेश भांडे चे नवखे पण त्यांचा विषयानूकुल प्रतिमा व प्रतिकांच्या वापर, सजगता व चिंतनशील प्रवृत्ती, मनाला भिडणारी शब्दकळा, या गुणवैशिष्ट्यामुळे दुर्लक्षित राहिले आहे. आजच्या सडक्या व्यवस्थेवर , एकाधिकारशाहीकडे झुकलेल्या राजकीय हेतूवर, राजसत्तेचे बाहुले बनून अन्यायाला जोजवणार्या बिकाऊ न्याय प्रणालीवर आसूड ओढणे हा काव्यलेखनाचा मूळ हेतू असल्याने साहित्यिक निकष व इतर भाषिक वैशिष्ट्य नजरेआड! बालाजी उबाळे यांचे मुखपृष्ठ वास्तवदर्शी असून गावाच्या आतील प्रस्थापित जग व गावाच्या वेशीबाहेरचे सामाजिक शोषण यांच्यामधील अंतर अधोरेखित करते, वेशीबाहेरची संस्कृती जीवंत करणारे चित्रण पाहून अंतरंगात डोकावून पाहण्याची इच्छा होते. पालमांडी वस्ती, कुत्रा, गाढव, भूकेने कासावीस मूलगा, दगडी चूलीवर रांधणारी आई, लक्ष्मण माने यांच्या "उपरा" ची आठवण करून देते. लक्ष्मण गायकवाड यांचीचिकित्सक व अनुभवाची जोड असलेली प्रत्ययकारी प्रस्तावना वेशीबाहेरचे अनुभूतीमूल्ये ठसठशीत करते.त्यांनी ठिगळं कवितेच्या ओळी उद्धृत करीत, दलितांच्या दु: यापेक्षाही गावकूसाबाहेरील भटक्यांच उपरेजीवन, उपरेपण अतिशय प्रभावीपणे मांडल्याचा निर्वाळा दिला आहे'मनुच्या उपद्व्यापाला कधीच उच्चाटीत होऊ दिले नाही आणि म्हणून आजही समता, बंधुता आणि न्याय ही चौकट इथल्या ढाळजाला दिसत नाही इथल्या विस्तृत नसलेल्या गल्लीबोळातील साप संचारत आहेतहा विषारी प्रवाह नितळ,निर्मळ, शुद्ध व्हायला तयार नाही 'हे प्रा. मुकुंद राजपंखे यांचे मुक्तक कवींच्या लेखन सामर्थ्याचे अचूक नोंद घेणारे आहे असे मला वाटते. अनघा प्रकाशनाने उत्कृष्ट संग्रह प्रकाशित केला आहे.मूळप्रवाहापासून कोसो दूर फेकलेल्या भटक्यांच अंगरंग समाजापुढे ठेवणार्या भांडेच विशेष अभिनंदन करतो. अर्धनग्न, फाटकतुटक अस्सल जीवंत चित्रण प्रभावीपणे लेखणीतून उतरावं. वेशीपल्याडच्या मूळनिवासी समूहाच्या व्यथा वेदनं अणकुचीदारपणे मांडण्यासाठी कवी राजेश यांना शुभेच्छा देतो!!!!



**समीक्षण: विद्रोही कवी साहेबराव मोरे**
**शब्द संवाद:९४०४०४८६०१**
**वेशीबाहेर काव्यसंग्रह**
**कवी: राजेश भांडे**
**प्रकाशन:अनघा, ठाणे**
**किंमत:₹४४/**

# ढगोबा

ढगोबा ढगोबा
तू जादूगार महान
कधी होतोस मोठा
कधी होतोस लहान

कधी अक्राळविक्राळ
तर कधी काळाकुट्ट
पाणी पिऊन पिऊन
झालास किती लठ्ठ

कधी दिसतोस पांढरा
पिंजलेल्या कापसावाणी
आपसात भांडतांना
गडगडाट येतो काणी

जोराची हवा सुटता
उडते तुझी तारांबळ
मोठ्याने गर्जना करीत
सुरू होते पळापळ

सूर्यासंगे तुझा कधी
जमत नाही मेळ
सतत आडवा येवूनी
चाले उन सावलीचा खेळ



**- रवींद्र चालीकवार**
मु.पो.ता.महागाव
जि.यवतमाळ
मो.९०११५५९१०६

प्रवेश सुरू
बी.ए. मराठी व उर्दू माध्यम
एम.ए मराठी, हिंदी, इंग्रजी व उर्दू
बालसंगोपन
डीप्लोमा गांधी विचार
मानवी हक्क प्रमाणपत्र
संपर्क
9405109103

महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ जून २०२६

# निष्पाप बालपणावर आक्रमकतेची सावली



दरवर्षी ४ जून हा दिवस जगभरात "आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन" म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक औपचारिक नोंद नाही, तर मानवी संवेदनशीलतेला जागृत करणारा, जगाच्या विवेकाला प्रश्न विचारणारा आणि बालहक्कांच्या संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. जगात जेव्हा जेव्हा युद्धे, दहशतवादी हल्ले, सशस्त्र संघर्ष, जातीय हिंसाचार, धार्मिक संघर्ष किंवा कोणत्याही प्रकारची आक्रमकता निर्माण होते, तेव्हा त्याचे सर्वाधिक गंभीर परिणाम निरपराध मुलांवर होतात. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि रंगीत स्वप्ने असावीत, त्या वयात अनेक मुलांच्या हातात भीती, असुरक्षितता आणि वेदना येतात. त्यांचे बालपण हिरावले जाते, शिक्षण खंडित होते, कुटुंबे तुटतात आणि भविष्य अंधकारमय बनते. या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्यासाठी आणि जगभरातील बालकांच्या संरक्षणासाठी जागतिक स्तरावर जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो.या आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात १९८२ मध्ये झाली. त्या काळात मध्यपूर्वेतील संघर्षांमध्ये विशेषतः लेबनॉन आणि पॅलेस्टाईन भागातील अनेक निष्पाप मुलांचा मृत्यू झाला होता. युद्धाच्या भयावहतेमुळे हजारो बालके जखमी झाली, बेघर झाली आणि मानसिक आघाताची शिकार झाली. या घटनांनी संपूर्ण जगाला हादरवून सोडले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ४ जून हा दिवस आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या संरक्षणासाठी जागतिक प्रयत्नांना बळ देण्यासाठी घोषित केला. कालांतराने या दिवसाचा आशय अधिक व्यापक झाला. आज हा दिवस केवळ युद्धग्रस्त मुलांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर कोणत्याही प्रकारच्या हिंसा, अत्याचार, शोषण, दडपशाही आणि आक्रमकतेचा बळी ठरलेल्या सर्व मुलांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे.बालपण हा मानवी जीवनाचा सर्वात नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते, त्यांची मानसिकता विकसित होत असते आणि त्यांच्या भविष्याचा पाया रचला जात असतो. प्रत्येक मुलाला प्रेम, माया, संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु वास्तवात जगातील लाखो मुले या मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत. संघर्ष, हिंसा आणि आक्रमकतेमुळे त्यांचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. जगात घडणाऱ्या प्रत्येक युद्धाचा आणि प्रत्येक हिंसक घटनेचा सर्वात मोठा फटका मुलांनाच बसतो.युद्ध हा मानवतेसाठी सर्वात मोठा शाप मानला जातो. युद्धात केवळ सैनिकच मरत नाहीत, तर निरपराध नागरिकांचेदेखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामध्ये मुलांचे प्रमाण लक्षणीय असते. युद्धामुळे घरे उद्ध्वस्त होतात, शाळा बंद पडतात, रुग्णालये नष्ट होतात आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्था विस्कळीत होते. अशा परिस्थितीत मुलांना अन्न, पाणी, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. अनेक वेळा त्यांना आपले घर, गाव आणि देश सोडून निर्वासित म्हणून जगावे लागते.युद्धग्रस्त प्रदेशांतील मुलांचे जीवन अत्यंत कठीण असते. सततचा गोळीबार, बॉम्बस्फोट, हवाई हल्ले आणि मृत्यूचे वातावरण त्यांच्या मनात कायमस्वरूपी भीती निर्माण करते. अनेक मुले आपल्या डोळ्यांसमोर आई-वडील, भाऊ-बहिण किंवा नातेवाईक गमावतात. काही मुले अनाथ होतात, तर काही कुटुंबापासून वेगळी होतात. अशा परिस्थितीत त्यांच्यावर होणारा मानसिक परिणाम अत्यंत गंभीर असतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते, बालपणी अनुभवलेले युद्ध आणि हिंसाचार यांचे परिणाम व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दिसून येतात.युद्धामुळे शिक्षणावर होणारा परिणामही गंभीर असतो. शाळा उद्ध्वस्त झाल्यामुळे किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद राहिल्यामुळे लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षण ही मुलांच्या विकासाची सर्वात प्रभावी गुरुकिल्ली आहे. शिक्षणामुळेच त्यांना आत्मविश्वास, कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्याची दिशा मिळते. परंतु संघर्षामुळे शिक्षण खंडित झाल्यास त्यांच्या जीवनातील अनेक संधी कायमच्या नष्ट होतात. अशा मुलांपैकी अनेकजण पुन्हा कधीही शाळेत जाऊ शकत नाहीत.आक्रमकतेचा परिणाम केवळ युद्धापुरता मर्यादित नसतो. घरगुती हिंसा ही देखील मुलांवरील आक्रमकतेचे एक गंभीर रूप आहे. अनेक मुले स्वतःच्या घरात शारीरिक, मानसिक किंवा भावनिक अत्याचार सहन करतात. पालकांमधील सततचे वाद, व्यसनाधीनता, आर्थिक तणाव आणि कौटुंबिक कलह यांचा परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर होतो. घर हे मुलांसाठी सुरक्षिततेचे ठिकाण असले पाहिजे; परंतु जेव्हा घरच भीतीचे केंद्र बनते, तेव्हा मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर गंभीर परिणाम होतो.बालकांवरील लैंगिक अत्याचार ही आधुनिक समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. जगभरात लाखो मुले अशा अत्याचारांची शिकार होतात. या अत्याचारांमुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही खोल परिणाम होतो. अनेक वेळा पीडित मुले भीतीमुळे किंवा सामाजिक दबावामुळे आपले अनुभव व्यक्त करू शकत नाहीत. परिणामी त्यांचे दुःख अधिक वाढते. बालकांच्या सुरक्षिततेसाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.बालमजुरी हे देखील मुलांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. जगातील अनेक भागांमध्ये अजूनही लाखो मुले काम करण्यास भाग पाडली जातात. गरिबी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता यांमुळे कुटुंबांना आपल्या मुलांना शिक्षणाऐवजी कामावर पाठवावे लागते. कारखाने, खाणी, बांधकाम क्षेत्र, शेती आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली ही मुले अनेकदा अमानुष परिस्थितीत काम करतात. त्यांचे शिक्षण थांबते, आरोग्य बिघडते आणि बालपण हिरावले जाते.मानवतस्करी ही मुलांसाठी आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक मुलांना फसवून, अपहरण करून किंवा गरिबीचा फायदा घेऊन तस्करीच्या जाळ्यात अडकवले जाते. त्यांचा वापर सक्तीच्या मजुरीसाठी, लैंगिक शोषणासाठी, भीक मागण्यासाठी किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी केला जातो. अशा मुलांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होते. त्यांना स्वातंत्र्य, शिक्षण आणि सन्मानाने जगण्याच्या संधींपासून वंचित राहावे लागते.तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मुलांसमोर नवीन प्रकारची आव्हाने उभी राहिली आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे संवाद आणि ज्ञानाची नवी क्षितिजे खुली झाली असली तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन छळ, डिजिटल फसवणूक आणि इंटरनेटद्वारे होणारे शोषण या समस्या वाढल्या आहेत. अनेक मुले सोशल मीडियावर अपमानास्पद संदेश, धमक्या किंवा मानसिक छळाला सामोरे जातात. या प्रकारच्या अनुभवांचा त्यांच्या आत्मविश्वासावर आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.संघर्ष आणि हिंसाचारामुळे निर्माण होणाऱ्या निर्वासितांच्या समस्येत मुलांचे प्रमाण खूप मोठे आहे. जेव्हा कुटुंबांना आपले घर सोडून सुरक्षिततेसाठी दुसरीकडे जावे लागते, तेव्हा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलून जाते. त्यांना नवीन वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. अनेक वेळा त्यांच्याकडे अन्न, पाणी, निवारा आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसतात. निर्वासित छावण्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना अनेक सामाजिक आणि मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते.बालकांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. संयुक्त राष्ट्रांनी बालहक्कांच्या संरक्षणासाठी विविध करार आणि धोरणे स्वीकारली आहेत. बालकांना जीवन, शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाचा अधिकार आहे, ही संकल्पना आज जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. तरीही अनेक देशांमध्ये या हक्कांची अंमलबजावणी अपुरी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता कायम आहे.बालकांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था संघर्षग्रस्त आणि अत्याचारग्रस्त मुलांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. शिक्षण, पोषण, आरोग्यसेवा, मानसिक आधार आणि पुनर्वसन कार्यक्रमांच्या माध्यमातून लाखो मुलांना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, समस्या इतकी व्यापक आहे की केवळ संस्थांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. संपूर्ण समाजाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.भारतातही बालसंरक्षणासाठी विविध कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, शिक्षणाचा अधिकार, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण आणि बालहक्क संवर्धन यांसाठी अनेक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या कल्याणासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. तरीही सामाजिक विषमता, गरिबी, अशिक्षण आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे अनेक आव्हाने कायम आहेत.बालसंरक्षणामध्ये कुटुंबाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. मुलांना प्रेम, विश्वास आणि सुरक्षिततेचे वातावरण मिळणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधला पाहिजे, त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराविरोधात बोलण्याचे धैर्य दिले पाहिजे. मुलांच्या मनातील भीती, ताण किंवा अस्वस्थता वेळेवर ओळखणे आणि त्यांना योग्य आधार देणे अत्यंत आवश्यक आहे.शाळा आणि शिक्षक यांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. शाळांनी सुरक्षित, समावेशक आणि संवेदनशील वातावरण निर्माण केले पाहिजे. विद्यार्थ्यांना मानवता, शांतता, सहिष्णुता आणि बालहक्क यांविषयी शिक्षण दिले पाहिजे. शाळांमध्ये समुपदेशन सेवा, तक्रार निवारण यंत्रणा आणि बालसंरक्षण धोरणे प्रभावीपणे राबविणे आवश्यक आहे.प्रसारमाध्यमे समाजात जागरूकता निर्माण करण्याचे प्रभावी माध्यम आहेत. बालकांवरील अत्याचारांच्या घटनांविषयी संवेदनशील आणि जबाबदार वृत्तांकन करून समाजाला जागृत करता येते. तसेच बालसंरक्षणाविषयी सकारात्मक संदेश देऊन लोकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण करता येते. माध्यमांनी मुलांच्या गोपनीयतेचे संरक्षण करताना त्यांच्या सन्मानाचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे.आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसते. त्यांना भावनिक आधार, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि सामाजिक स्वीकाराची आवश्यकता असते. कला, संगीत, क्रीडा, साहित्य आणि विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करता येतो. त्यांना पुन्हा सामान्य जीवनाकडे आणण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे.शांतता, सहिष्णुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती ही मुलांच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. जगातील कोणत्याही कोपऱ्यातील हिंसा आणि संघर्षाचा परिणाम शेवटी निष्पाप मुलांवर होतो. त्यामुळे युद्धाऐवजी संवाद, द्वेषाऐवजी सहकार्य आणि हिंसेऐवजी मानवतेचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.४ जून रोजी साजरा होणारा 'आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन' आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे संरक्षण ही केवळ कायद्याची किंवा शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि आनंदी बालपण मिळाले पाहिजे. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जपणे, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवणे आणि त्यांना भीतीमुक्त वातावरण देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.आजच्या या निमित्ताने आपण असा संकल्प करूया की कोणत्याही मुलाला हिंसा, शोषण किंवा आक्रमकतेचे बळी ठरावे लागणार नाही. प्रत्येक बालकाला शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाच्या समान संधी मिळतील. कारण मुलांचे बालपण सुरक्षित असेल तरच मानवतेचे भविष्य सुरक्षित राहील. निष्पाप मुलांचे संरक्षण म्हणजे केवळ एका पिढीचे संरक्षण नाही, तर संपूर्ण जगाच्या उद्याचे संरक्षण आहे. म्हणूनच या आंतरराष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून बालहक्कांच्या रक्षणासाठी आणि हिंसामुक्त, न्याय्य व संवेदनशील समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे हीच काळाची खरी गरज आहे.



**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**ईमेल — bagate.rajendra5@gmail.com**

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार ०४ जून २०२६


# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी दिली जनगणना प्रगणकाला स्वत:ची माहिती



**बीड (भगवंत पाळवदे) :** बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बुधवार दि. ३ जून २०२६ रोजी आपल्या शासकीय निवासस्थानी आलेल्या जनगणना प्रगणकाला स्वत:ची व कुटुंबाची संपूर्ण माहिती देऊन नोंदणी पूर्ण केली. या औपचारिक नोंदणीसह बीड जिल्ह्यात जनगणनेच्या राष्ट्रीय मोहिमेला गती मिळाली आहे. याप्रसंगी बोलताना जिल्हाधिकाऱ्यांनी देशाच्या आणि राज्याच्या सर्वांगीण विकासात जनगणनेचे असलेले अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित केले. शासकीय योजनांचे अचूक नियोजन, आखणी आणि प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी जनगणना हा अत्यंत महत्त्वाचा आणि मुख्य आधार आहे. जनगणना ही देशाच्या विकासाचा पाया मानली जाते. लोकसंख्या, शिक्षण, रोजगार, निवास, आरोग्य यासारखी महत्त्वाची माहिती जनगणनेतून मिळते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाची नोंद होणे हे देशाच्या आर्थिक व सामाजिक प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले. पुढे बोलताना त्यांनी जिल्ह्यातील सर्व नागरिकांना या मोहिमेत सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. आपल्या घरी येणाऱ्या जनगणना प्रगणकाला कोणतीही भीती किंवा संकोच न बाळगता अचूक, खरी आणि योग्य माहिती देऊन पूर्ण सहकार्य करावे, असेही ते म्हणाले.

नागरिकांनी दिलेल्या या सकारात्मक सहकार्यामुळेच ही राष्ट्रीय मोहीम पूर्णपणे यशस्वी होईल, असा दृढ विश्वासही विवेक जॉन्सन यांनी यावेळी व्यक्त केला. याप्रसंगी जनगणनेशी संबंधित प्रगणक, अधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

# बीड एसटी महामंडळात शिकाऊ उमेदवारांची भरती

**बीड, (भगवंत पाळवदे):** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बीड विभागीय कार्यालयाअंतर्गत सन 2026-27 या सत्रासाठी विविध व्यवसायांमध्ये शिकाऊ उमेदवार निवड प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. एसटी महामंडळाच्या कार्यशाळेत थेट कामाचा अनुभव मिळविण्याची सुवर्णसंधी बीड जिल्ह्यातील तांत्रिक शिक्षण घेतलेल्या तरुणांना या निमित्ताने मिळणार आहे. कौशल्याधारित रोजगाराला चालना देण्यासाठी केंद्र शासनाने तयार केलेल्या अधिकृत एम.आय.एस पोर्टलच्या नियमानुसार ही भरती होत आहे. ही निवड प्रक्रिया प्रथम ऑफलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारून आणि त्यानंतर ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे. इच्छुक पात्र उमेदवारांनी केंद्र सरकारच्या अधिकृत Apprenticeship India.org या संकेतस्थळाला भेट देऊन माहिती घ्यावी. इंटरनेट किंवा तांत्रिक अडचणी असल्यास उमेदवारांनी थेट विभागीय कार्यालय, राज्य परिवहन महामंडळ, बीड येथे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

तसेच अधिक माहितीसाठी महामंडळाच्या 02442-222580 या अधिकृत दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बीड एसटी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

# शेतकऱ्यांना कर्जमाफी की 'शब्दच्छल'? योजनेवरून विरोधक आक्रमक

**मुंबई :** राज्यातील महायुती सरकारने जून महिन्याच्या पहिल्याच मंत्रिमंडळ बैठकीत 2 लाख रुपयांपर्यंतच्या कर्जमाफीचा निर्णय घेतला असला, तरी या योजनेतील अटी व शर्तींवरून आता राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. काँग्रेस, शिवसेना (ठाकरे गट) आणि शेतकरी संघटनांनी या योजनेला 'फसवी' आणि 'शेतकऱ्यांची क्रूर थट्टा' असल्याचे संबोधले असून, संपूर्ण सात-बारा कोरा करण्याची मागणी लावून धरली आहे.

सरकारने 2 लाख रुपयांपर्यंतचे थकीत पीककर्ज माफ करण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र यामध्ये काही अटी घातल्या आहेत. शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यासह नियमित कर्ज भरणाऱ्यांना देखील सरकारकडून 50 हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. मात्र या निर्णयाला राजकीय वर्तुळात आगामी निवडणुकांशी जोडले जात असून, विरोधकांनी याला 'लाडकी बहीण' योजनेप्रमाणेच केवळ निवडणुकीचा देखावा असल्याचे म्हटले आहे.

देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील भाजपा महायुती सरकारने जाहीर केलेली कर्जमाफी योजना हा निव्वळ देखावा आहे. या योजनेमध्ये शब्दच्छल करून नियम, अटी व शर्ती टाकून जवळपास 50 टक्क्यांपेक्षा जास्त शेतकऱ्यांना या योजनेतून जाणीवपूर्वक बाहेर ठेवलेले आहे. ही शेतकऱ्यांची क्रूर थट्टा असून सरकारने राज्यातील सर्व शेतकऱ्यांचा सात-बारा कोरा करावा, अशी मागणी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, ही कर्जमाफी केवळ 1 एप्रिल 2019 ते 31 मार्च 2025 या काळातील थकीत कर्जासाठी आहे. ज्या शेतकऱ्यांचे कर्ज त्याआधीपासून थकीत आहे आणि ज्यांना नवीन पीककर्ज मिळू शकलेले नाही, अशा मोठ्या वर्गाला यातून वगळण्यात आले आहे.

सरकारची ही योजना फक्त पीककर्ज आणि पुनर्गठित कर्जापुरती मर्यादित आहे. ज्या शेतकऱ्यांनी विहीर, पाईपलाईन किंवा पशुपालनासाठी कर्ज घेतले आहे, त्यांना या योजनेचा कोणताही फायदा होणार नाही. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्यांना प्रोत्साहनपर 50 हजार रुपयांचा लाभ मिळवण्यासाठी 2026-27 पर्यंत कर्ज घेऊन ते वेळेत भरण्याची अट घालण्यात आली आहे, जी पूर्णपणे अन्यायकारक असल्याचे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी प्रश्न उपस्थित केला की, "2 लाखांपर्यंत कर्जमाफी दिली तरी त्यावरील रक्कम भरण्यासाठी शेतकऱ्यांकडे पैसे कुठून येणार? खरीप हंगाम उलटून गेल्यावर जर खात्यात पैसे पडणार असतील, तर शेतकऱ्याला त्याचा उपयोग काय?" असा सवालही त्यांनी केला. विजय वडेट्टीवार म्हणाले, "या कर्जमाफीचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही. कर्जमाफी मार्चपूर्वी द्यायला हवी होती, दोन लाखापर्यंत कर्जमाफीची घोषणा झाल्यावर वरील पैसे भरण्यासाठी शेतकऱ्याकडे कुठे पैसे आहेत? शेतकरी कर्जमाफीचा निर्णय आज झाला. मात्र, खात्यामध्ये पैसे कधी पडतील, त्याला किती कालावधी लागेल, जर खरीप हंगाम झाल्यावर ते पैसे खात्यात पडेल तर शेतकरी खरीप हंगाम करू शकणार नाही. म्हणून या कर्जमाफीचा फक्त देखावा होणार, याचा शेतकऱ्यांना कोणताही फायदा होणार नाही."

# समतेचा झेंडा

हल्ली जातीयवादी लोकच
समतेचा झेंडा घेऊन मिरवतात
समाजातील लोकही
अशांनाच मोठं मानतात

समतेचा झेंडा घेणारांना मात्र
जातीयवादी लोक देशद्रोही ठरवतात
समाजातील अंधभक्तही
त्यांनाच बेदखल करतात

जे सत्तेत असायला हवेत
त्यांना मात्र तुरुंगात डांबले जाते
जे गुन्हेगार तुरुंगात असायला हवेत
त्यांना मात्र सत्तेत सामावले जाते

लोकशाहीचे धिंडवडे उडवताहेत
सामान्यांचे जीवघेणे हाल
याविरुद्ध कोणी आवाज उठवला
त्याला मरणयातना भोगाव्या लागताहेत

कायदा राबवणारेही गद्दारच
खोट्यांच्या बाजूने उभे राहताहेत
सत्तेतील,पदावरील सगळे
इथून तिथून विषमतेने वागताहेत

हल्ली माणुसकी दिसत नाही
जात धर्म प्यारा झाला आहे
व्यवस्थेला प्रश्न विचारणारे मात्र
समाजातुन बाहेर फेकला जात आहे.



प्रा. डॉ.सतीश मस्के
मो 9423397484